*मुळा एज्युकेशन सोसायटीचे*

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई,

ता. नेवासा, जि. अहमदनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

## *रस्ता सुरक्षा अभियान*

**दि.२५/०८/२०१९**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्री क्षेत्र शनीशिंगनापुर येथे दि. २५/०८/२०१९ रोजी रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या वेळी जनजागृतीसाठी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली.या प्रभात फेरीचे उद्घाटन शनीशिंगनापुर पोलिस स्टेशनचे वाहतूक पोलिश हवालदार यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शनीशिंगनापुर देवस्थानचे कार्यकारी संचालक मा. गोरक्षनाथ दरंदले प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते. प्रभात फेरीत सहभागी विद्यार्थ्यांनी रस्त्याने जाणार्याल प्रवाशांपैकी चारचाकी शिटबेल्ट विना व दुचाकी विना हेल्मेट वाहन धारकांना गुलाब पुष्प देऊन शीटबेल्ट व हेलमेट वापरन्याची विनंती करून गांधीगिरी केली.

प्रभात फेरीमधील विद्यार्थ्यांनी मद्यपान करून वाहने चालउ नका , वाहतुकीचे नियम पाळा , प्रवास करताना हेल्मेट व शिटबेल्ट वापरा , वाहने चालवताना मोबाइलचा वापर टाळा यासारखे फलक हातात घेऊन घोषणा दिल्या. या अभियानात १८० रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. प्रभात फेरीचे आयोजन प्राचार्य डॉ. शंकर लावरे , उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विठ्ठलराव दरंदले, प्रा. तुकाराम जाधव, प्रा. शरद औटी यांनी विशेष परिश्रम घेतले.


ड्रायव्हिंग
करताना
रस्ता सुरक्षा अभियान


श्री
शनिकृपा
कोल्ड्रींक्स
maaza






श्री शनैश्वर देवस्थान

